कोविड-१९ आजारावरील वैद्यकीय खर्च
<u>प्रतिपूर्तीची देयकांची परिगणना करणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०२१/प्र.क्र.१८८/राकावि-२**


गोकुलदास तेजपाल रूग्णालय आवार, संकूल इमारत
१० वा मजला बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४००००१

दिनांक : २२ जून, २०२२

<u>वाचा -</u>

**१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५.**
**२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दिनांक १७ डिसेंबर, २०२०.**
**३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दिनांक ३० एप्रिल, २०२१.**
**४) अधिसूचना क्रमांक : कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आरो-५, दि.२१ मे, २०२०.**
**५) अधिसूचना क्रमांक : कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आरो-५, दि.३१ ऑगस्ट, २०२०.**
**६) अधिसूचना क्रमांक : कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आरो-५, दि.३० नोव्हेंबर, २०२०.**
**७) अधिसूचना क्रमांक : कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आरो-५, दि.१ जून, २०२१.**

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भाधीन क्र.१ च्या दिनांक १९ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आकस्मिक प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मिळणेकरीता २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीत संदर्भाधीन क्र.२ च्या दि.१७ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये "कोविड-१९" या नवीन आजाराचा आकस्मिक आजारांमध्ये समावेश करण्यात आला आहे. या आदेशांमध्ये (संदर्भाधीन क्र.२ मध्ये) दि.३० एप्रिल, २०२१ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारणा करण्यात आली असून सदर आदेश आता दि.२१ मे, २०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आले आहेत. संदर्भाधीन अधिसूचना क्र.४, ५,६, व ७ अन्वये खाजगी व शासनमान्य खाजगी रुग्णालयातील कोविड-१९ या आजारावरील वैद्यकीय उपचार खर्चाची दर निश्चिती करण्यात आली आहे. सदर अधिसूचनांनुसार "कोविड-१९" या आजारावरील उपचाराच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या देयकांची परिगणना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आता, सदर शासन निर्णयान्वये असे आदेश देण्यात येत आहेत की, या विभागाच्या अधिसूचना क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आ-५, दि.२१/०५/२०२० अन्वये “कोविड-१९” या आजारावरील उपचारखर्चाची दरनिश्चिती करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेमध्ये दि.३०/०८/२०२०, दि.३०/११/२०२० व दि.०१/०६/२०२१ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे खाजगी व शासनमान्य खाजगी रुग्णालयातील उपचाराच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या प्रकरणात, संबंधित रुग्णाचा रुग्णालयातील आंतररुग्ण कालावधी ज्या शासन अधिसूचनेच्या कालावधीशी संबंधित आहे, त्या शासन अधिसूचनेनुसार “कोविड-१९” या आजाराविषयक वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या देयकाची परिगणना करण्यात यावी.

२. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनादेखील लागू करण्यांत यावा, मात्र यापुर्वीची निर्णित ठरलेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यांत येऊ नये.

३. सदर शासन निर्णयास वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २६/सेवा-५, दि.२४/०५/२०२२ नुसार मान्यता दिली आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६२२१४४१५८१६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH MADHUKAR LAD

Digitally signed by MAHESH MADHUKAR LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=25beab36016c9d18b34e813ce2c51ae3ba862f5ee940326a80ef8dfa067b2f3b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B0B7B24B48EA4D47E171EF81F64A0D535EBB08400DA6060265D4872BADAEACA, cn=MAHESH MADHUKAR LAD
Date: 2022.06.22 17:26:38 +05'30'

**( महेश म. लाड )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुबई.
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लँड रेकॉर्डस, पुणे
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) महालेखापाल-१ , (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६) महालेखापाल- २, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) चीफ ऑडिटर लोकल फंड्स अकाऊंटस, मुंबई.
२०) सर्व कोषगार अधिकारी,
२१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
२२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
२३) संचालक, आयुर्वेद, मुंबई,
२४) संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
२५) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
२७) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
२८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३०) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
३१) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३२) प्रोथोनेटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३३) वित्त विभाग, (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,
३४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
३५) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन),मंत्रालय, मुंबई,
३६) निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनांना विनंती करण्यात येते की,त्यांनी सदर शासन परिपत्रकाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच, संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.